बीड (महाराष्ट्र) दैनिक ● मराठी ● वर्ष ०१ ● अंक ३५५ ● शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ ● आरएनआय – एमएचएमएआर /२५/ए२३६९ ● किंमत २ रु. ● पाने ४
Beed (Maharashtra) Daily ● Marathi ● Year - 01 ● Issue - 355 ● Saturday Dt.5 September 2026 ● RNI: MHMAR/25/A2369 ● Price - 2 Rupees ● Pages 4
PRAVAKTA LOKSHAHICHA
दैनिक प्रवक्ता लोकशाहीचा
मुख्य संपादक : नितीन रावण मुजमुले, मो.9673210438

## मागील बैठकांमध्ये कोणते निर्णय झाले आणि हाती काय लागले ?

मराठवाड्यात २०१४पासून मंत्रिमंडळाच्या दोन बैठका झाल्या. पहिल्या बैठकीच्या वेळी अगदी विभागीय आयुक्तालयाच्या पायऱ्या बदलण्यात आल्या होत्या. मात्र, या बैठकीत घेतलेले अनेक निर्णय पुढे अंमलबजावणीमध्ये आले नाहीत. यात मराठवाडा वॉटर ग्रीड हा प्रकल्प हाती घेण्याचे ठरविण्यात आले होते. इस्त्राएलच्या मेराकोटा नावा कंपनीला याचे आराखडे बनविण्यास सांगितले होते. जायकवाडीसह अन्य जलस्रोत जोडून पाण्याचे वितरण करण्याची ही योजना काही पूर्ण झाली नाही. तत्कालीन पाणीपुरवठा मंत्री बबनराव लोणीकर यांच्यासह काही प्रभावी आमदारांनी मग आपापल्या गावाच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजना मंजूर करून घेतल्या. या योजनांना पुढे ग्रीड म्हटले जाऊ लागले. जलसंपदाच्या विविध योजनांचा निधी एकत्र करून मराठवाडा दुष्काळमुक्त करू, असे आश्वासन सातत्याने दिले जाते. याशिवाय अन्य योजनांचे पैसे एकत्र करून 'छप्परफाड' आश्वासनांचा खेळ अजूनही सुरू आहे.

# मराठवाड्याला पाण्यासाठी अजुन किती तरसावणार



**मराठवाडा मंत्रिमंडळ बैठकीतील छप्परफाड आश्वासने हवेतच**

**४७ हजार कोटींच्या निर्णयांचे काय झाले ?; अंमलबजावणीचा वेग संथ !**

**मंत्रिमंडळ बैठक पुन्हा चर्चेत ; निर्णयांच्याअंमलबजावणीवरून विरोधक सरकारला घेरणार**

बीड / प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती दिनाच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी सप्टेंबरमध्ये मंत्रिमंडळ बैठकीची चर्चा रंगते. मराठवाड्याचा मागासलेपणा दूर करण्यासाठी मोठ्या घोषणा आणि कोट्यवधी रुपयांच्या योजनांची आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी किती झाली, हा प्रश्न कायम आहे. २०१४ नंतर मराठवाड्यात दोन मंत्रिमंडळ बैठका झाल्या. जलसंपदा, पाणीपुरवठा, सिंचन आणि इतर विकासकामांसाठी मोठ्या निधीची घोषणा करण्यात आली. २०२३ मधील बैठकीत तब्बल ४७ हजार कोटी रुपयांच्या २० निर्णयांची घोषणा झाली. त्यापैकी जलसंपदा विभागासाठी १३ हजार ५६२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. काही कामे सुरू झाली असली तरी अनेक प्रकल्प अद्याप भूसंपादन, निविदा किंवा निधीअभावी रखडल्याचे चित्र आहे. मराठवाडा वॉटर ग्रीड, सिंचन प्रकल्प आणि नगरपालिका पाणीपुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचा वेगही अपेक्षेप्रमाणे नसल्याचा आरोप आहे. अनेक शहरांना आजही काही दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा करावा लागतो. दरम्यान, मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयांची गांभीर्याने अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी बैठकीच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या घोषणांचा आणि प्रत्यक्ष कामांचा हिशेब मांडण्याचा प्रयत्न विरोधकांकडून होण्याची शक्यता आहे. कारण मंत्रिमंडळ बैठकातून होणाऱ्या निर्णयाचे अंमलबजावणीमध्ये रुपांतर होत नाही. नेमकी काय स्थिती आहे ?

### सप्टेंबरमध्ये मराठवाड्यात मंत्रिमंडळांची बैठक का घेतली जाते ?

१७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. एक मोठा भूप्रदेश स्वतंत्र झाला. यात मराठवाड्यातील तत्कालीन पाच जिल्हे होते. आता ही संख्या आठ आहे. गेली अनेक वर्षे विविध क्षेत्रांत मागास असणाऱ्या मराठवाड्याला पुढे आणण्यासाठी स्वतंत्र निधी देऊ, असे आश्वासन देण्यात आले. अ. र. अंतुले मुख्यमंत्री असताना मंत्रिमंडळाची बैठक घेण्याचेही ठरविण्यात आले. पहिली बैठक १९८१मध्ये घेण्यात आली. यावेळी देण्यात आलेल्या आश्वासनांचे वर्णन करताना 'छप्परफाड' आश्वासने असा मथळा 'मराठवाडा' दैनिकात प्रकाशित करण्यात आला. पुढे मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त ध्वजारोहण होऊ लागले. निमित्ताने बैठक होऊ लागल्या. मुख्यमंत्री असताना विलासराव देशमुख यांनी बैठकीत राष्ट्रवादीवर कुरघोडी केली. लातूर, बीड, उस्मानाबाद या तीन जिल्ह्यांसाठी २५ टीएमसी पाणी मंजूर करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार हे आडकाठी आणत आहेत, असे चित्र निर्माण करण्यात आले. या पाण्यापैकी पुढे २३ .३२ अब्ज घनफूट पाणी मंजूर झाले. यातील फक्त सात टीएमसी पाणी अडविण्यास कृष्णा पाणी तंटा लावादाने परवानगी दिली. हे पाणी सिंचनासाठी मिळेल, अशी आशा गेल्या २५ वर्षांपासून सुरू आहे. आता हे काम झालेच आहे, असे सांगण्यात येते. अजून पाणी काही आले नाही.

### २०२३ मधील बैठकीतील निर्णयांचे पुढे काय झाले ?

या मंत्रिमंडळ बैठकीवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते आणि देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री होते. या बैठकीमध्ये २० निर्णय घेण्यात आले होते. निधीचा आकडा ४७ हजार कोटी रुपयांचा होता. यातील जलसंपदा विभागातील विविध कामांसाठी केलेली तरतूद होती १३ हजार ५६२ कोटी रुपयांची. यातील काही कामांच्या निविदा पूर्ण होऊन काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. काही प्रकल्पाचे काम २२ टक्के पूर्ण आहे. भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे, अशी उत्तरे जलसंपदा विभागाकडून दिली जातात. मात्र, अशी अनेक कामे आहेत, ज्याचे पुढे काहीच होऊ शकले नाही. अनेक नगरपालिकांना पिण्याच्या पाण्याच्या योजना मंजूर करण्यात आल्या होत्या. पण काम काही पूर्ण झाले नाही. आजही मराठवाड्यात फक्त दोन किंवा तीन नगरपालिका क्षेत्रात दररोज पाणीपुरवठा होत असेल. बाकी सर्व नगरपालिकांमध्ये कधी पाच दिवस तर कधी आठ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होतो. सिंचन आणि पाणीपुरवठा या दोन्ही विभागात कमालीच्या संथ गतीने कामे सुरू आहेत. अनेक योजनांना निधीच मिळालेला नाही. अनेक मंदिरांचा निधी, स्वातंत्र्य सैनिकांचे स्मृतीस्थळे याच्या विकासासाठीही निधी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. पण अनेक बाबींना निधीच मिळाला नाही, असा आरोप कायम आहे.

### आता मंत्रिमंडळातील बैठकीतील आश्वासनांवरून राजकीय फड रंगेल का?

मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयावर गांभीर्याने अंमलबजावणी केली जात नाही, असे आरोप आमदार अंबादास दानवे यांनी यापूर्वी केले होते. तसे पत्रही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून दिले. शिवसेनेच्या ठाकरे गटाने हा प्रश्न उचलून धरला असून, १७ सप्टेंबर रोजी उद्धव ठाकरे यांच्याही दौऱ्याचे नियोजन केले जात आहे. यामुळे मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयाकडे सरकार किती गांभीर्याने पाहते आहे, हे लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी विरोधक प्रयत्न करत आहेत. एका बाजूला मराठा आरक्षणाचा विषय तापत असताना तसेच 'सीजेपी'चे अभिजित दिपके शाळा भेटी देत असताना तरुणांची संख्या कार्यक्रमात वाढवत मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयाचा विषय राजकीय पटलावर आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## कंबरेला गावठी कट्टा लावून फिरणारा तरुण एलसीबीच्या जाळ्यात

बीड / प्रतिनिधी

बीड शहरातील जालना रोड परिसरात कंबरेला गावठी कट्टा (पिस्तूल) लावून फिरणाऱ्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने ताब्यात घेतले. ही कारवाई ३ सप्टेंबर रोजी करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, जालना रोडवरील रिलायन्स मॉलजवळ एक ट्रक चालक कंबरेला गावठी कट्टा लावून फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई करत सत्यम अशोक कासार (वय २३, रा. अस्तीगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) याला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडून एक गावठी कट्टा (पिस्तूल) आणि चार जिवंत काडतुसे, अंदाजे ५४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल, जप्त करण्यात आला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू



आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनित कांवत, अपर पोलिस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलिस अधिकारी व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## रिपाइं पदाधिकाऱ्यांची 8 सप्टेंबर रोजी महत्वपूर्ण बैठक – आयोजित – राजू जोगदंड

बीड / प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने राज्यभर समता मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. समता मार्च रॅलीच्या अनुषंगाने केंद्रीयमंत्री रामदास आठवले हे दि. 16 ऑक्टोबर 2026 शुक्रवार रोजी समता मार्च रॅलीसाठी बीड जिल्ह्यात येणार आहेत. रिपाइंच्या वतीने आयोजित समता मार्च रॅलीच्या पूर्वतयारीसाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाभरातील रिपाइं पदाधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक मंगळवार दि.8 मार्च 2026 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नगर रोड बीडच्या सभागृहात सकाळी ठीक 11 वाजता आयोजित करण्यात आली आहे.



तरी रिपाइंच्या जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, जिल्हा भरातील तालुका कार्यकारिणी पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाइं पदाधिकारी, शहर कार्यकारिणी पदाधिकारी, यांनी दि. ८ सप्टेंबर 2026 मंगळवार रोजी आंबेडकर भवनाच्या सभागृहात सकाळी ठीक 11 वाजता आयोजित बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे. असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केले आहे.

## शिवाजीनगर पोलिसांची धाडसी कारवाई ; पाठलाग करून शस्त्रधारी ५ आरोपींना थार गाडीसह पकडले

बीड / प्रतिनिधी

बीड शहरातील शिवाजीनगर पोलिसांनी गंभीर मारहाण व आपत्कालीन परिस्थितीतील प्रकरणात धाडसी कारवाई करत पाठलाग करून पाच शस्त्रधारी आरोपींना थार गाडीसह अटक केली. ही घटना १ सप्टेंबर रोजी माने कॉम्प्लेक्स, मौजेक सलूनसमोर घडली होती. शेती खरेदीच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद होऊन एका गटाने दुसऱ्या गटावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिस अंमलदार सचिन आगलावे व बाळू रहाडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना पाहताच



आरोपींनी वाहनातून पळ काढण्यास सुरुवात केली. पोलिसांनी पाठलाग करून वाहन अडवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी वाहनाचा वेग वाढविला. दरम्यान, पोलिसांनी थार गाडीचा पाठलाग सुरू ठेवत आरोपींना पकडले. या कारवाईत बाबू उर्फ निनानाथ शहादेव जाधव, हनुमान शहादेव जाधव, संभाजी सिताराम जाधव, यशराज रामा जाधव आणि सागर गंगाराम जाधव यांना अटक करण्यात आली. सर्व आरोपी वायभटवाडी, ता. व जि. बीड येथील रहिवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या गुन्ह्यात एकूण १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल असून, पाच जणांना अटक झाली आहे.

## २० नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्यांनी स्वच्छता सभापती यांचा राजीनामा घेण्यासाठी मुख्याधिकारी यांना आंबेडकरवादी युवकांनी घेरले

**बाबासाहेबांच्या मिरवणुकीत नाल्याचे पाणी ; आता राजीनाम्याच्या मागणीवर विशेष सभा घ्यावीच लागणार !**

बीड / प्रतिनिधी

दि. १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बीड शहरात निघालेल्या मिरवणुकीच्या मार्गावर नाल्याचे घाण पाणी रस्त्यावर आले आणि नागरिक व आंबेडकरी अनुयायांना त्यातून मार्गक्रमण करावे लागले. ही घटना केवळ स्वच्छता व्यवस्थेचे अपयश नाही, तर नगरपरिषदेच्या जबाबदारीवर आणि संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे.

या घटनेनंतर आता २० नगरसेवकांनी लेखी स्वाक्षऱ्या करून स्वच्छता सभापती श्री. शेख निजाम यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर चर्चा व निर्णय घेण्यासाठी विशेष सभा बोलावण्याची मागणी केली आहे.म्हणून आता प्रश्न साधा आहे–विशेष सभा बोलावणार की लोकशाहीची मागणी फाईलमध्ये दडपून ठेवणार ?नगरसेवकांनी आपली वैधानिक मागणी लेखी स्वरूपात दिली आहे. त्यामुळे आता मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता कायद्यानुसार तातडीने विशेष सभा बोलावावी.पण २० नगरसेवकांनी



स्वाक्षरी करून सभागृहात निर्णय घेण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आता विषय भावनिक नाही वैधानिक आहे.सभागृहात चर्चा झाली पाहिजे. जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.मतदान झाले पाहिजे.आणि निर्णय अधिकृत इतिवृत्तात नोंदवला पाहिजे.बाबासाहेबांच्या जयंतीची मिरवणूक नाल्यातून जाते आणि जबाबदार पदाधिकारी खुर्चीत बसून राहतात, हे बीडकर जनता सहन करणार नाही !बाबासाहेबांच्या जयंतीची मिरवणूक नाल्यातून जाते आणि जबाबदार पदाधिकारी खुर्चीत बसून राहतात, हे बीडकर जनता सहन करणार नाही !ज्या शहरात नागरिकांकडून कर वसूल केला जातो, ज्या नगरपरिषदेवर स्वच्छतेची जबाबदारी आहे, त्या शहरातील प्रमुख मिरवणुकीच्या मार्गावर नाल्याचे पाणी साचणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. जर स्वच्छता व्यवस्थेची जबाबदारी असलेल्या पदाधिकाऱ्यांकडून ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली गेली नाही, तर नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची तयारी आहे का? आणि जर जबाबदारी स्वीकारायची नसेल, तर–मग खुर्चीला चिकटून बसण्याचा हट्ट कशासाठी ?प्रशासनाला स्पष्ट इशारा २० नगरसेवकांची लेखी मागणी दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न झाला, विशेष सभा लांबवण्यात आली किंवा विषय दडपण्याचा प्रयत्न झाला, तर या संपूर्ण प्रक्रियेबाबत सक्षम प्राधिकरणाकडे कायदेशीर दाद मागण्यात येईल. कारण हा कोणत्याही एका व्यक्तीचा वैयक्तिक विषय नाही.हा बीडकरांच्या मूलभूत नागरी सुविधांचा प्रश्न आहे.हा नगरसेवकांच्या वैधानिक अधिकारांचा प्रश्न आहे. हा सार्वजनिक उत्तरदायित्वाचा प्रश्न आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे–हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या मिरवणुकीत नागरिकांना झालेल्या त्रासाचा प्रश्न आहे.आता एकच मागणी विशेष सभा घ्या !२० स्वाक्षऱ्या झाल्या आहेत.मागणी लेखी झाली आहे.प्रश्न सभागृहाच्या दारात उभा आहे. आता प्रशासनाने ठरवायचे आहे–लोकशाहीचा सन्मान करणार की राजकीय दबावापुढे. यावेळी प्रा.सनी वाघमारे, पॅथंर प्रेम कांबळे,कपिल इनकर ,ॲड .तेजस वडमारे,अशोक भाऊ वीर, आशिष चव्हाण, बाळासाहेब काकडे,शुभम प्रधान,शुभम सवाई,धीरज वडमारे यांनी बीड नगर परिषद मुख्याधिकारी यांना 20 नगरसेवकांचे विशेष सभा घेण्याचे पत्र दिले.

## कास्ट्राइब महासंघाच्या जिल्हाध्यक्ष जनरल पदी सुमेध जोगदंड तर जिल्हाध्यक्ष आरोग्य पदी मनोज वाघमारे यांची निवड

**कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघाच्या अंबाजोगाई येथे विभागीय बैठक संपन्न**

बीड / प्रतिनिधी

जिल्हाध्यक्ष जनरल पदी सुमेध जोगदंड तर जिल्हाध्यक्ष आरोग्य पदी मनोज वाघमारे यांची निवड –कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघाची लातूर विभागीय अध्यक्ष मा. बाळासाहेब सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक 31 ऑगस्ट 2026 रोजी शासकीय विश्रामगृह अंबेजोगाई येथे बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये राहुल पोटभरे यांनी आपल्या प्रस्ताविकेत संघटनेच्या कायार्चा आलेख सांगितला.

त्याच बरोबर सुमेध जोगदंड, राहुल टाकणखार यांनी संघटनेच्या पुढील दिशा ठरविण्यासाठी आपले विचार व्यक्त केले. या बैठकी मध्ये इच्छुक कर्मचाऱ्यांना वेगवेगळी पदांची जबाबदारी देण्यात आली. या प्रसंगी सुमेध जोगदंड जिल्हाध्यक्ष जनरल पदी व मनोज वाघमारे यांची जिल्हाध्यक्ष आरोग्य पदी तर बीड जिल्हा सचिव शिक्षण पदी





बाळासाहेब डोंगरदिवे यांची निवड करण्यात आली. विभागीय अध्यक्ष मा.बाळासाहेब सोनवणे यांनी कास्ट्राइब संघटनेच्या आगामी ध्येय धोरणा बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. विविध पदावर निवड केलेल्या कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत. आपल्या पदाला न्याय देण्याचे आवाहन केले. शेवटी कास्ट्राइब संघटनेचे राज्य महासचिव दिवंगत मा. एस टी गायकवाड साहेब यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आपल्या पहाडी आवाजामध्ये भारत टाकणखार यांनी केले. स्नेहभोजन घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## संपादकीय

# आम्ही नाही पाहिली !

इंग्रजीत ह्यद प्रूफ ऑफ द पुडिंग इज इन द ईटिंगह्व असा वाक्प्रचार आहे. एखादा पदार्थ चवीस चांगला की वाईट हे ठरवण्याची अंतिम चाचणी तो खाऊन पाहण्यात असते; असा त्याचा अर्थ. केंद्र सरकारच्या सांख्यिकी विभागाने प्रसृत केलेल्या अर्थगतीच्या ताज्या तपशिलाने सुरू झालेली चर्चा या इंग्रजी वाक्प्रचाराचे स्मरण करून देते. केंद्राच्या दाव्यानुसार आपल्या अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत (१ एप्रिल ते ३१ जून २०२६) ७.८ टक्के इतकी वाढ नोंदवली. अर्थव्यवस्थेची इतकी मोठी घोडदौड सुरू असल्याचे सरकारला वाटत असले तरी प्रत्यक्षात आपली विकास–गती इतकी आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. तो किती रास्त होता त्याची चुणूक अवघ्या काही तासांत दिसली. कारण काही मान्यवर आणि सरकारमान्य तज्ज्ञांनी सांख्यिकी विभागाच्या या दाव्यावर प्रश्न निर्माण केले असून त्याचा समाधानकारक प्रतिवाद सरकारला करता आलेला नाही. प्रगतीचा सरकारी दावा खोडून काढर्णायात काँग्रेस पक्षही असला तरी त्याचा विचार या संपादकीयात करण्यात आलेला नाही. त्यामागे काँग्रेसच्या युक्तिवादावर शंका व्यक्त करणे हे कारण नाही. तर त्यामागे; विरोधी पक्ष या नात्याने काँग्रेसने आपले कर्तव्य पार पाडले; त्यात वेगळे काय, ही भूमिका आहे. हा प्रश्न माजी अर्थसचिव सुभाषचंद्र गर्ग यांच्याबाबत विचारता येणार नाही. कारण ते विद्यमान सरकारच्या काळातच अर्थसचिव होते आणि निर्मला सीतारामन यांची अर्थमंत्रीपदाची कारकीर्द त्यांनी आतून अनुभवलेली आहे. त्यामुळे त्यांनी या सरकारच्या दाव्याची केलेली चिरफाड सरकारच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्न निर्माण करणारी ठरते. बरे, या गर्ग यांची नेमणूक विद्यमान सरकारनेच केली होती. त्यामुळे आधीच्या सरकारचे सुरू राहिलेले पाप; असेही म्हणायची सोय नाही. हे वास्तव लक्षात घेता गर्ग यांच्यासारख्या अधिकारी व्यक्ती सरकारच्या दाव्याची सरकारनेच दिलेल्या माहितीच्या आधारे लक्तरे करून चव्हाट्यावर टांगत असतील तर त्याची दखल न घेणे अवघड. सर्वप्रथम गर्ग दाखवून देतात की आताच्या ७.८ टक्क्यांच्या दाव्याप्रमाणेच गतसालच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाची (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) वाढही ७.८ टक्के असेल असा सरकारचा त्या वेळी दावा होता. नंतर या दाव्यात बदल करून ही अर्थगती ६.९ टक्के इतकी खाली आणली गेली. ही सुधारणा नंतर झाली. म्हणजे आताच्या दाव्यातही सरकार नंतर सुधारणा करू शकते, असे गर्ग सूचित करतात. या सरकारचा इतिहास लक्षात घेतल्यास असा अविश्वास व्यक्त करण्यात काही गैर नाही. चलनवाढ, त्याचा परिणाम आदी मुद्दे वगळून नंतर सकल राष्ट्रीय उत्पन्न मोजले जाते. याचा अर्थ असा की आत्ताची अर्थगती मोजण्यासाठीची आकडेवारीही आत्ताचीच हवी. म्हणजेच काल काय झाले ते आजच्या वास्तवाधारे मोजता येणार नाही. हा मुद्दा तर्कदृष्ट्याही अत्यंत योग्य. त्यातून गर्ग यांचा पुढील अधिक गंभीर युक्तिवाद समोर येतो. गतसाली सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा सुरुवातीचा आकार ८६ लाख कोटी रु. (८६ ट्रिलियन रु.) इतका होता जो सरकारने नंतर कमी करून ८० लाख कोटी रुपयांवर आणला. त्यामुळे झाले असे की आताचा ७.८ टक्के इतका अर्थविकास गृहीत धरला तर हे सकल राष्ट्रीय उत्पादन होते ८८ लाख कोटी रु. इतके. साहजिकच ते आधीच्या ८० लाख कोटी रुपयांच्या तुलनेत १० टक्क्यांनी जास्त होते. पण गर्ग यांचे चोख म्हणणे असे की जर आधीचे ८६ लाख रु. ह्यसराउह्व जर खाली ८० लाख रुपयांवर आणले नसते तर आताची वाढ जेमतेम दोन लाख कोटी रुपयांची ठरली असती. म्हणजे जेमतेम दोन–अडीच टक्के. तसे दाखवणे सरकारला परवडले नसते. याचा अर्थ आताची वाढ अधिक दाखवता यावी म्हणून गतसालातील अर्थगतीची उंची सरकारने कमी केली. गर्ग हे सोदाहरण स्पष्ट करून सांगतात. हे म्हणजे खुर्ची उंच वाटावी यासाठी समोरच्या टेबलाचे पाय कापणे. कारण अर्थव्यवस्था इतकी झपाट्याने खरोखरच वाढत असती तर बाजारात उत्साह ओसंडून वाहताना दिसला असता, उद्योगपतींची गुंतवणूक लगीनघाई जाणवेल इतकी वाढली असती आणि रोजगाराच्या चिंतेने तरुणांची झोप उडाली नसती. प्रत्यक्षात हे सगळे होताना दिसते. सरकार आवाहन करून करून थकले. उद्योगपती काही गुंतवणूक करावयास तयार नाहीत. त्यांना भारतापेक्षा परदेशच बरा वाटू लागलेला आहे. बाजारात अतिश्रीमंत सोडले तर कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि त्याहीपेक्षा आर्थिक विवंचना अनुभवणारे आपल्या आटलेल्या उत्पन्नातही उद्याच्या चिंतेमुळे जमेल तितकी काटकसर करण्याच्या प्रयत्नात दिसतात. अशा वातावरणात नव्या रोजगार निर्मितीची किती बोंब आहे हे काही नव्याने सांगण्याची गरज नाही. तेव्हा बाजारात मागणी आहे कोठे, हा गर्ग यांचा प्रश्न रास्त. सरकारचा पुरवठा वाढल्याचा दावा ते आटत चाललेल्या मागणीचा तपशील देऊन खोडून काढतात. ही आकडेवारीही परत सरकारचीच. हे झाले गर्ग यांचे. रघुराम राजन यांच्यासारखे अर्थतज्ज्ञ त्यापुढे जात एक साधा सोपा प्रश्न विचारतात. अर्थव्यवस्थेची गती जर ७.८ टक्के इतकी आहे असे सरकार म्हणते, तर त्या मानाने रोजगार निर्मिती का कुंठितावस्थेत; हा त्यांचा प्रश्न. तो योग्य. अर्थव्यवस्था वाढते आहे असे एकीकडे म्हणायचे आणि ती कोठे वाढते आहे, त्या वाढत्या अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मिती किती होत आहे इत्यादी मुद्द्यांची उत्तरेच द्यायची नाहीत, हे कसे? परत रोजगारशून्य वाढ (जॉबलेस ग्रोथ) हा शब्दप्रयोगही सरकारला अमान्य. पंतप्रधानांच्या अर्थसल्लागार परिषदेचे एक सदस्य संजीव सन्याल यांनी मध्यंतरी ह्यरोजगारशून्य वाढह्व असे काही नसते, असे विधान केले. त्यांना हे वास्तवच मान्य नाही. यातही गंमत अशी की काँग्रेस सत्तेवर असताना भाजपच्या अनेक नेत्यांनी त्या वेळी अर्थव्यवस्थेबाबत हाच शब्दप्रयोग केला होता. तेव्हा तो राजमान्य होता आणि आता नाही; हे कसे? तेव्हा हा ७.८ टक्के अर्थविकासाचा दावा अधिकाधिक चर्चेत येणार आणि त्याची अधिकाधिक उलटतपासणी होणार, हे उघड दिसते. नागरिकांनी परदेशी जाऊ नये, सोने खरेदी करू नये वगैरे सरकारी आवाहनाने उलट या उलटतपासणीस गती मिळेल. इतकी भरभराट होत असेल तर चातुर्य संपादनासाठी खरे तर अधिकाधिक प्रवास करा असा सल्ला सरकारने द्यायला हवा. त्यामुळे मागणी वाढेल, चार पैसे खर्च केले जाऊन अर्थव्यवस्थेत धुगधुगी निर्माण होईल. पण सरकारचा कारभारच उफराटा. प्रगती होते आहे, कमाई चांगली आहे; पण तरी मौज करू नका, असा हा सल्ला. त्यामुळे वास्तव सरकार सांगते तसे नाही की काय असा प्रश्न पडतो. गर्ग यांच्यासारख्यांकडून त्याचे उत्तर मिळते. सरकारने सत्य स्वीकारावे असाही त्यांचा सल्ला आहे. सत्यनिष्ठ, सत्यवादी सरकार त्याचे निश्चित पालन करेल. मराठी घरात रांगत्या बाळाचे कवतिक करण्यासाठी अमुक उभा राहिला आम्ही नाही पाहिला असे बडबडगीत म्हटले जाते. त्या धर्तीवर उद्या अर्थव्यवस्था वाढली, आम्ही नाही पाहिली असे म्हटले जाऊ नये, इतकेच.

# तुलसी शिक्षण समूह : परिवर्तनवादी विचारांचे चालते-बोलते विद्यापीठ

## एसएनडीटी महिला विदयापीठ युवा महोत्सव २०२६च्या निमित्ताने अनुभवलेली शैक्षणिक क्रांती



मुंबईत काही कार्यक्रम आपण पाहतो, काही कार्यक्रम आपण अनुभवतो आणि काही कार्यक्रम आपल्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवून जातात. एसएनडीटी युवा महोत्सव २०२६ हा माझ्यासाठी अशाच अविस्मरणीय अनुभवांपैकी एक ठरला. हा महोत्सव केवळ नृत्य, संगीत, कला, साहित्य आणि विविध सांस्कृतिक स्पर्धांचा सोहळा नव्हता; तर तो शिक्षण, संस्कार, स्वावलंबन, समता आणि परिवर्तनवादी विचारांची पेरणी करणारा एक व्यापक सामाजिक उपक्रम होता. एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई आणि देवगिरी प्रतिष्ठान, बीड संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझायनिंग, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ विभागीय युवा महोत्सव २०२६मध्ये प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित राहण्याचा मला योग आला. या महोत्सवाच्या निमित्ताने तुलसी शिक्षण समूहाचे काम जवळून पाहण्याची आणि अनुभवण्याची संधी मिळाली. त्या अनुभवातून मनात एक विचार प्रकषार्ने उमटला तुलसी हे केवळ एका महाविद्यालयाचे नाव नाही; तुलसी हा एक विचार आहे, एक चळवळ आहे आणि परिवर्तनवादी शिक्षणाची दिशा दाखवणारे चालते–बोलते विद्यापीठ आहे.

### तुलसी नावामागची मातृशक्ती आणि परिवर्तनाची प्रेरणा

तुलसी शिक्षण समूहाचे सर्वेसर्वा प्रा. प्रदीपजी रोडे यांनी आपल्या आईच्या तुलसी मातेच्या नावाने हे शैक्षणिक कार्य उभे केले. आईला केवळ नावापुरते जपण्याऐवजी त्या नावामागील संस्कार, ममत्व, त्याग आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी त्यांनी आपल्या शैक्षणिक कायार्तून जिवंत ठेवली आहे.

तुलसी म्हटले की भारतीय संस्कृतीत पवित्रता, संवर्धन आणि जीवनदायी ऊर्जा यांची आठवण होते. त्याचप्रमाणे तुलसी शिक्षण समूहानेही अनेक मुलींच्या आयुष्यात ज्ञानाची, आत्मविश्वासाची आणि स्वावलंबनाची नवी ऊर्जा निर्माण करण्याचे काम केले आहे. भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचे स्वप्न पाहिले. शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून ते माणसाला विचार देणारे, आत्मसन्मान देणारे आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे सामर्थ्य देणारे माध्यम आहे, हा या महापुरुषांचा विचार होता. याच विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याचा प्रयत्न प्रा. प्रदीपजी रोडे करत असल्याचे या महोत्सवाच्या निमित्ताने प्रकषार्ने जाणवले.

### परिवर्तनवादी महापुरुषांना वंदन करून महोत्सवाची सुरुवात

या युवा महोत्सवाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुरुवातच परिवर्तनवादी महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करून झाली. सुमारे दीड हजार विद्यार्थिनींच्या उपस्थितीत दिलेला संदेश अत्यंत अर्थपूर्ण होता तुम्ही सावित्रीच्या रूपात आहात; मुलगी घडली की देश घडतो. हा केवळ एक घोषवाक्य नव्हता, तर संपूर्ण महोत्सवाचा आत्मा होता. आजच्या काळात मुलींच्या शिक्षणाबद्दल आपण मोठमोठ्या घोषणा करतो; मात्र प्रत्यक्षात त्यांच्या शिक्षणासाठी, सुरक्षिततेसाठी, स्वावलंबनासाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी किती संस्था मनापासून काम करतात, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तुलसी समूहाने मात्र मुलीला केवळ विद्यार्थी म्हणून न पाहता भविष्यातील सक्षम नागरिक, उद्योजक, कलाकार, व्यावसायिक आणि समाजघटक म्हणून घडविण्याचा प्रयत्न केल्याचे जाणवले. रोडे कुटुंबाची विद्यार्थिनींप्रती आई–वडिलांसारखी माया या संपूर्ण महोत्सवात मला सर्वाधिक भावलेली गोष्ट म्हणजे विद्यार्थिनींबद्दलची आत्मीयता. संपूर्ण रोडे कुटुंब जणू या विद्यार्थिनींच्या पाठीशी आई–वडिलांप्रमाणे उभे होते. प्रा. प्रदीपजी रोडे, सौ. दीपा मॅडम, त्यांचा मुलगा इंजि.दिपंकर, कन्या डॉ.प्रियंका आणि तुलसी समूहातील प्रत्येक सदस्य कार्यक्रमाच्या यशासाठी स्वतःला झोकून देताना दिसत होता. कार्यक्रमाचे नियोजन करताना एखादी व्यक्ती किती बारकाईने विचार करू शकते, याचे उदाहरण या महोत्सवातून पाहायला मिळाले. विद्यार्थिनींच्या राहण्यापासून जेवणापर्यंत, आरोग्यापासून वाहतुकीपर्यंत, कार्यक्रमाच्या वेळापत्रकापासून तांत्रिक व्यवस्थेपर्यंत प्रत्येक बाबीचा विचार करण्यात आला होता. एखाद्या कार्यात माणसाने स्वतःला किती झोकून द्यावे? याचे उत्तर रोडे कुटुंबाकडून शिकावे, असेच वाटले. वंचित घटकातील मुला–मुलींना दजेर्दार शिक्षण मिळाले पाहिजे प्रा. प्रदीपजी रोडे यांच्या कायार्मागील मूलभूत विचार अत्यंत स्पष्ट आहे. समाजातील सर्वसामान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील मुला–मुलींनाही दजेर्दार शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे. हा विचार केवळ भाषणापुरता मर्यादित नसून त्यांच्या प्रत्यक्ष कामातून दिसून येतो. शिक्षणसंस्था उभारणे सोपे नाही. त्यासाठी आर्थिक नियोजन, मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, प्रशासन, सामाजिक बांधिलकी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सातत्याने काम करण्याची मानसिकता आवश्यक असते. प्रा. रोडे हे या सर्व बाबींमध्ये जातीने लक्ष घालतात, हे महोत्सवाच्या आयोजनातून जाणवले. त्यांच्यासाठी विद्यार्थी म्हणजे केवळ महाविद्यालयाच्या नोंदणीवरील नाव नाही; तर त्यांच्या भविष्यासाठी जबाबदारी स्वीकारलेली एक व्यक्ती आहे, अशी भावना त्यांच्या कायार्तून दिसते. विचारांची पेरणी करणारा युवा महोत्सव युवा महोत्सव म्हणजे तरुणाईचा उत्सव. मात्र तुलसी समूहाने या उत्सवाला केवळ मनोरंजनाची चौकट न ठेवता विचारांचा उत्सव बनविले. उद्घाटन समारंभात एसएनडीटी विद्यापीठाच्या ललित कला अकादमीचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांनी संत जनाबाईच्या अभंगापासून सुरुवात करून संत तुकाराम महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या क्रांतिकारी विचारांपर्यंत



**प्रो.डॉ.विनोद उपरवट**
सिनेट सदस्य, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

अत्यंत प्रभावी मांडणी केली. संतपरंपरेपासून समाजपरिवर्तनाच्या आधुनिक चळवळीपर्यंतचा हा वैचारिक प्रवास विद्यार्थिनींसाठी अत्यंत प्रेरणादायी होता. समारोपाच्या प्रसंगी महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम अभिनेता गौरव मोरे यांनीही तरुणाईला महत्त्वाचा संदेश दिला तुमच्या सहवासात कोण येतो, हे सर्वात महत्त्वाचे आहे; त्यामुळे नेहमी चांगल्या लोकांच्या सहवासात रहा. तर मी स्वतः आईच्या महिमेवर मनोगत व्यक्त केले. कारण मुलींच्या शिक्षणाचा आणि स्त्रीच्या सक्षमीकरणाचा विचार करताना आई ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे.

### शिक्षणाबरोबर स्वावलंबनाचा मंत्र

तुलसी शिक्षण समूहाच्या कायार्तील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे शिक्षणाबरोबर रोजगार आणि स्वावलंबनाला दिलेले महत्त्व. आज अनेक विद्यार्थी पदवी मिळवतात; परंतु पदवीनंतर रोजगार कुठे मिळणार, आर्थिक स्वावलंबन कसे मिळवणार आणि स्वतःचा व्यवसाय कसा उभारणार, हा प्रश्न त्यांच्यासमोर असतो. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी प्रा. प्रदीपजी रोडे यांनी तुलसी क्रिएशन्स – द कम्प्लिट वुमन्स ड्रीम वर्ल्ड हे भव्य शोरूम उभे केले आहे.

हे केवळ एक व्यावसायिक शोरूम नसून विद्यार्थिनींसाठी रोजगार, प्रशिक्षण आणि उद्योजकतेची प्रयोगशाळा असल्याचे जाणवते. येथे विद्यार्थिनींना रोजगाराच्या संधी मिळतात आणि शोरूममधून मिळणारे उत्पन्न पुन्हा विद्यार्थिनींच्या विकासासाठी वापरले जाते, ही संकल्पना विशेष उल्लेखनीय आहे. आज शिक्षणाचे व्यापारीकरण आणि बाजारीकरण यावर मोठ्या प्रमाणात चर्चा होत असताना, शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना उद्योजक बनविण्याचा विचार निश्चितच अभिनंदनीय आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारांची ही आधुनिक काळातील कृतीशील मांडणी आहे, असे मला वाटते.

शोभायात्रेतून रस्त्यावर उतरलेली शैक्षणिक क्रांती युवा महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महापुरुषांच्या विचारांची भव्य शोभायात्रा. बीड शहरातून सुमारे एक ते दोन किलोमीटर अंतराची ही शोभायात्रा काढण्यात आली. मात्र ही केवळ शोभायात्रा नव्हती; ती विचारांची मिरवणूक होती. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक योगदानाचे दर्शन विविध देखाव्यांतून घडविण्यात आले. शिक्षणसंस्थेच्या चार भिंतीत राहणारे विचार रस्त्यावर आणण्याचे काम या शोभायात्रेने केले. बीड शहरातील नागरिकांनीही हा विचार अनुभवला. ज्ञान जर समाजापर्यंत पोहोचले नाही, तर त्याचे परिवर्तनात रूपांतर होत नाही. या भूमिकेतून पाहिले तर तुलसी समूहाने शिक्षणाला समाजाशी जोडण्याचे काम या शोभायात्रेतून केले. या उपक्रमामागे प्रा. डॉ. मनोहर शिरसाठ आणि तुलसी समूहातील सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. या संपूर्ण संकल्पनेच्या अंमलबजावणीत दीप रोडे यांची भूमिकाही विशेष उल्लेखनीय ठरली. विद्यापीठ आणि तुलसी परिवार एका कुटुंबाप्रमाणे वाटला

या महोत्सवाला एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो उज्वला चक्रदेव यांनी पाठविलेला संदेश महत्वपूर्ण ठरला. रजिस्ट्रार डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. नितीन प्रभू तेंडुलकर, मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य डॉ. साईनाथ बनसोडे, सिनेट सदस्य डॉ. विनोद उपरवत, प्राचार्य डॉ. रामकिसन दहिफळे डॉ भगवंसिंग ढोबल, जयंत करपे, प्रा सुनिलजी मगरे, जोंधळे, अनेक संस्था चालक,आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

विशेष म्हणजे मान्यवरांनी केवळ व्यासपीठावर बसून कार्यक्रम पाहिला नाही, तर विद्यार्थिनींच्या आनंदात सहभागी होत लेझीम खेळण्याचा आनंदही घेतला.

ही दृश्ये मनाला आनंद देणारी होती. विद्यार्थिनींच्या आनंदात विद्यापीठ सहभागी झाले होते आणि विद्यापीठाच्या आनंदात तुलसी परिवार सहभागी झाला होता. हीच तर शिक्षणाची खरी ताकद आहे. विद्यार्थी, शिक्षक, संस्था आणि समाज यांच्यातील भिंती दूर करून एक कुटुंब निर्माण करणे. दीड हजार विद्यार्थिनी आणि दोन हजारांहून अधिक उपस्थिती या युवा महोत्सवात एसएनडीटीच्या एकूण ४९ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. सुमारे दीड हजार विद्यार्थिनी, दोनशे–तीनशे प्रेक्षक आणि मान्यवर अशा दोन हजारांहून अधिक उपस्थितीने संपूर्ण परिसर उत्साहाने भरून गेला होता. इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थिनींचे व्यवस्थापन करणे ही स्वतःमध्ये मोठी जबाबदारी होती. परंतु नियोजन आणि व्यवस्थापनाच्या माध्यमातून तुलसी समूहाने ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली.

### विद्यार्थिनींसाठी इमर्जन्सी प्रथमोपचाराची सुविधा

डॉक्टरांची उपस्थिती,सुरक्षिततेची काळजी, उत्तम भोजन व्यवस्था, चहा–नाश्त्याची व्यवस्था, राहण्याची सुविधा, विशेष बस व्यवस्था, लिफ्टची सुविधा,भव्य मंडप,अत्याधुनिक साऊंड सिस्टिम अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

विद्यार्थिनींच्या मनोगतातून एकच भावना वारंवार व्यक्त होत होती. या महोत्सवात आमची आई–वडिलांसारखी काळजी घेतली गेली. यापेक्षा मोठे आयोजनाचे यश कोणते असू शकते? लिफ्टपासून जेवणापर्यंत प्रत्येक गोष्टीत विद्यार्थिनी केंद्रस्थानी या महोत्सवात मला एक विशेष बाब जाणवली. अनेकदा मोठ्या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे, मान्यवर आणि आयोजक यांच्या व्यवस्थेला प्राधान्य दिले जाते. मात्र येथे विद्यार्थिनी केंद्रस्थानी होत्या. एका मजल्यावरून पाचव्या मजल्यापर्यंत लिफ्टने जाण्याचा अनुभवही विद्यार्थिनींसाठी आनंदाचा विषय ठरला. विशेष बसची व्यवस्था, निवास, भोजन, आरोग्य सुविधा आणि कार्यक्रमस्थळी सहज व सुरक्षित प्रवेश या प्रत्येक बाबीत विद्यार्थिनींच्या सोयीचा विचार करण्यात आला. प्रमुख अतिथी, विद्यापीठाचे प्रतिनिधी, पत्रकार, बीड शहरातील आमंत्रित नागरिक आणि विद्यार्थिनी–कोणालाही कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू नये, यासाठी प्रा. प्रदीपजी रोडे यांनी घेतलेली मेहनत स्पष्टपणे दिसत होती. आनंद, कला आणि परिवर्तनवादी विचारांचा संगम युवा महोत्सवाचा शेवटही अत्यंत उत्साहपूर्ण झाला. तरुणाई डीजेच्या तालावर नाचत होती. मात्र त्या आनंदालाही एक वैचारिक अधिष्ठान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गीतांवर तरुणाई थिरकत होती. ही बाब विशेष अर्थपूर्ण वाटली. कारण मनोरंजन आणि विचार यांची सांगड घालता येते, हे या महोत्सवाने दाखवून दिले. तरुणाईला आनंद हवा आहे, संगीत हवे आहे, नृत्य हवे आहे; पण त्याच वेळी त्यांना इतिहास, विचार, समता आणि परिवर्तनाची जाणीवही देता येते.तुलसी समूहाने ही सांगड अत्यंत प्रभावीपणे साधली.हा महोत्सव नव्हता; ही एक विचारचळवळ होती दरीत विचार केला तर एसएनडीटी युवा महोत्सव २०२६ हा केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नव्हता.तो होता. कलेचा उत्सव, तरुणाईचा उत्सव, स्त्रीशक्तीचा उत्सव, शिक्षणाचा उत्सव, स्वावलंबनाचा उत्सव आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे परिवर्तनवादी विचारांचा उत्सव. महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाचे स्वप्न पाहिले. सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी समाजाच्या विरोधाला न जुमानता शाळेची वाट धरली.महात्मा फुले यांनी शिक्षणाला सामाजिक समतेचे साधन मानले. छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण आणि सामाजिक न्यायाला राजकीय–सामाजिक पाठबळ दिले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला मुक्तीचे शस्त्र बनविले.या सर्व महापुरुषांच्या विचारांची आठवण करून देत तुलसी शिक्षण समूह आजच्या काळात मुलींना शिक्षण, कौशल्य, रोजगार, स्वावलंबन आणि आत्मविश्वास देण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणूनच मला वाटते– तुलसी हे केवळ शिक्षणसंस्थेचे नाव नाही; तुळसी हा परिवर्तनाचा विचार आहे. मातृ–पितृ छायेतून संस्कारांचे आकाश प्रा. प्रदीपजी रोडे यांचे एक वाक्य या संपूर्ण कायार्ची दिशा स्पष्ट करते मातृ–पितृ छायेतूनच संस्काराचे आकाश विस्तारते आणि त्या आशीवार्दातूनच देशाचे शिखर गाठता येते.ह्व या विचारामागे केवळ भावनिकता नाही, तर शिक्षणाचा एक व्यापक दृष्टिकोन आहे. मुलांना केवळ पदवी देणे म्हणजे शिक्षण नव्हे. त्यांना माणूस बनविणे, विचार देणे, आत्मविश्वास देणे, स्वतःच्या पायावर उभे करणे आणि समाजासाठी जबाबदार नागरिक बनविणे म्हणजे खरे शिक्षण. तुळसी शिक्षण समूह याच दिशेने वाटचाल करत असल्याचे मला या युवा महोत्सवाच्या निमित्ताने जाणवले. तुलसी एका महाविद्यालयापासून एका चळवळीपर्यंत आज शिक्षणक्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. शिक्षणाचे व्यापारीकरण, बेरोजगारी, कौशल्याचा अभाव, ग्रामीण आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांसमोरील अडचणी, मुलींच्या शिक्षणातील अडथळे या सर्व प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत एखादी शिक्षणसंस्था जर आपल्या विद्यार्थिनींचे भविष्य हीच आपली जबाबदारीह्व या भावनेने काम करत असेल, तर त्या कार्याकडे निश्चितच आशेने पाहावे लागेल. तुलसी शिक्षण समूहाने मला हाच आशावादी अनुभव दिला.या युवा महोत्सवात मी एक कार्यक्रम पाहिला नाही; मी एक विचार प्रत्यक्ष जगताना पाहिला. मी एका कुटुंबाला विद्यार्थिनींसाठी झटताना पाहिले.मी एका शिक्षणसंस्थेला समाजाशी जोडताना पाहिले. मी एका युवा महोत्सवाला विचारमंच बनताना पाहिले.मी महापुरुषांच्या विचारांना रस्त्यावर उतरताना पाहिले. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मी तरुण मुलींमध्ये आत्मविश्वासाची नवी ज्योत पेटताना पाहिली.

शेवटचा विचार तुलसी शिक्षण समूहाची ही वाटचाल अशीच पुढे जात राहो. हजारो मुली शिक्षित होवोत, स्वावलंबी होवोत, उद्योजक बनोत, आपल्या कुटुंबाला आणि समाजाला दिशा देवोत आणि महापुरुषांनी दाखविलेल्या समतेच्या, स्वातंत्र्याच्या आणि बंधुतेच्या मार्गावर पुढे जावोत, हीच अपेक्षा. एसएनडीटी युवा महोत्सव २०२६च्या निमित्ताने मला मिळालेला हा अनुभव माझ्यासाठी केवळ एक आठवण नाही; तो एका परिवर्तनवादी शैक्षणिक चळवळीचा साक्षीदार होण्याचा आनंद आहे. म्हणूनच शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते तुलसी म्हणजे केवळ नाव नव्हे, तुलसी म्हणजे विचार. तुलसी म्हणजे केवळ महाविद्यालय नव्हे, तुलसी म्हणजे परिवर्तनाची चळवळ.तुलसी म्हणजे केवळ शिक्षण नव्हे, तुलसी म्हणजे शिक्षणातून स्वाभिमान आणि स्वावलंबन. आणि म्हणूनच तुलसी शिक्षण समूह हे परिवर्तनवादी विचारांचे चालते–बोलते विद्यापीठ आहे !ह्व एसएनडीटी युवा महोत्सव २०२६ ने हा विश्वास अधिक दृढ केला.

# शिक्षक दिन निमित्ताने आधुनिक शिक्षणातील हरवलेला का?

दिनांक ५ सप्टेंबर रोजी आपण सर्वजण देशव्यापी शिक्षक दिन साजरा करतो . यानिमित्ताने आधुनिक शिक्षणातील हरवलेला ३का३ यावर थोडक्यात टाकलेला हा एक दृष्टिक्षेप . एखाद्या विद्यार्थ्यार्ला परीक्षेत ९५ टक्के गुण मिळतात . घरात आनंद होतो, पालकांचा अभिमान वाढतो आणि शिक्षक समाधानी होतात . पण पुस्तक बंद करून त्याला शिकलेली एखादी साधी गोष्ट स्वत ःच्या शब्दांत समजावून सांगायला सांगितले आणि पुढे विचारलेह्लअसं का होतं ?ह्व तर कधी कधी तोच विद्यार्थी अडखळतो . ही विद्यार्थ्याची चूक आहे का, की आपल्या शिक्षणपद्धतीसमोरचा प्रश्न ? आज आपण मुलांना काय लक्षात ठेवायचे हे शिकवतो ; पण का, कसे आणि परिस्थिती बदलली तर काय ? याचा विचार करण्यासाठी पुरेसा वेळ देतो का ? प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ रिचर्ड फाइनमन यांनी ज्ञान आणि आकलन यातील फरक स्पष्ट केला . एखाद्या गोष्टीचे नाव



किंवा व्याख्या माहीत असणे म्हणजे ती समजली असे नाही . खरे आकलन प्रश्न विचारण्यापासून सुरू होते .

पाठांतर चुकीचे नाही . स्मरणशक्ती ही ज्ञानाची पायरी आहे ; पण ती अंतिम ध्येय नसावे . पी . आय .एस .ए . २०२२ मध्ये ओ .ई .सी .डी . ने प्रथमच ६४ देश आणि अर्थव्यवस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशील विचारक्षमतेचे मूल्यमापन केले . यावरूनही स्पष्ट होते की भविष्यासाठी केवळ माहिती आठवणे पुरेसे नाही ; माहितीचा वापर करून विचार करणे आवश्यक आहे . म्हणून पालकांनी फक्त किती गुण मिळाले ? असे न विचारता, आज तुला काय समजले ? असेही विचारावे . शिक्षकांनीही स्वत ःला विचारावे माझा विद्यार्थी उत्तर लक्षात ठेवतोय की विचार करायला शिकतोय ?

मुलाने का ? विचारले तर लगेच तयार उत्तर देऊ नका . कधी कधी म्हणा मलाही माहीत नाही . चला, आपण दोघे मिळून शोधूया .

कदाचित त्या क्षणी आपण एका प्रश्नाचे उत्तर शोधत नसतो ; आपण एका विचार करणाऱ्या मनाची सुरुवात करत असतो . कारण शिक्षणाचे खरे यश केवळ ९५ टक्क्यांत नाही ; ते त्या ९५ टक्क्यांच्या मागे जिवंत असलेल्या एका छोट्याशा प्रश्नात आहे — का ?

– डॉ . अजितकुमार यादव
BE, ME,
Ph.D.(Submitted), संशोधक,
संस्थापक ( रामानुजन अकॅडमी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, बीड .)

# डीजेविरोधात आवाज उठवणाऱ्या विद्यानंद बापट यांना मारहाण

## प्रशासनाची पोलखोल करणाऱ्या संतोष पंडित यांच्या अटकेच्या निषेधार्थ बीडमध्ये निदर्शने

## सरकारच्या दबावाखाली कार्यकर्त्यांवर कारवाई केल्याचा आरोप ; निष्पक्ष चौकशीची मागणी — डॉ . गणेश ढवळे

बीड / प्रतिनिधी

पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट हे डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे मानवी आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि पर्यावरणावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांविरोधात लोकशाही मार्गाने आवाज उठवत आहेत. डीजेच्या वाढत्या ध्वनिप्रदूषणाला आळा घालून त्यावर कठोर निर्बंध आणावेत, अशी त्यांची मागणी आहे. मात्र, या आंदोलनादरम्यान विद्यानंद बापट यांना संतोष चव्हाण नामक व्यक्तीने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेच्या निषेधार्थ तसेच सामाजिक कार्यकर्ते संतोष पंडित यांच्या अटकेच्या निषेधार्थ बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी निदर्शने करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्ते संतोष पंडित हे सोशल मीडियाच्या माध्यमातून सरकारचे प्रतिनिधी तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कथित भ्रष्टाचार आणि गैरप्रकारांवर सातत्याने आवाज उठवत असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. त्यांना पोलिसांनी मध्यरात्री अटक करून पाच दिवसांची पोलीस कोठडी दिल्याचा आरोप करण्यात आला. ही कारवाई लोकशाही मूल्यांना बाधक असून, सरकारच्या दबावाखाली करण्यात आली असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. सामाजिक कार्यकर्त्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही,ह्वअसा इशारा देत सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रशासनाच्या दडपशाहीचा धिक्कार असो, संतोष पंडित यांची अटक रद्द करा ' ध्वनीप्रदूषणावर आळा घाला. निदर्शने करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन देण्यात आले. विद्यानंद बापट यांच्यावरील मारहाणीची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच संतोष पंडित यांच्या अटकेची चौकशी करून त्यांच्यावरील कारवाईबाबत फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, किष्किंधा पांचाळ (जिल्हाध्यक्ष, विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज, बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक बीड), सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड), प्राचार्य डॉ. डी. जी. तांदळे ( जिल्हा उपाध्यक्ष तथा प्रसिद्धी प्रमुख अंधश्रद्धा निर्मूलन समिती बीड), ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, बाजीराव ढाकणे (अध्यक्ष व्यसन विरोधी प्रमुख बीड)आदी सहभागी झाले. डीजेच्या कर्णकर्कश ध्वनीमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाविरोधात आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना संरक्षण मिळावे आणि सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या कार्यकर्त्यांवरील कारवाई निष्पक्षपणे तपासण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.




**डीजेविरोधात आवाज उठवणाऱ्या बापटांना मारहाण**

पुण्यात डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाविरोधात आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांना संतोष चव्हाण नामक व्यक्तीने मारहाण केल्याचा आरोप आहे . या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी बीडमधील आंदोलनकर्त्यांनी केली .

**संतोष पंडित यांच्या अटकेचा निषेध**

प्रशासनातील कथित भ्रष्टाचार व गैरप्रकारांविरोधात सोशल मीडियातून आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते संतोष पंडित यांना पोलिसांनी मध्यरात्री अटक करून पाच दिवसांची पोलीस कोठडी दिल्याचा आरोप करण्यात आला . या कारवाईचा निषेध करत बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली . कारवाईची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली .

**कार्यकर्त्यांच्या संरक्षणाची मागणी**

डॉ . गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने झाली . यावेळी प्रशासनाच्या दडपशाहीचा निषेध करत संतोष पंडित यांची अटक रद्द करण्याची मागणी करण्यात आली . विद्यानंद बापट यांच्यावरील मारहाणीची चौकशी, दोषींवर कारवाई आणि सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या कार्यकर्त्यांना संरक्षण द्यावे, अशी मागणी मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांकडे करण्यात आली .

# सर्वांगीण समाज सुधारक राजयोगी श्री संत भगवान बाबा : मोहन महाराज खरमाटे



बीड / प्रतिनिधी

सलग 18 वर्षाची अखंड परंपरा डॉ.राजेंद्र भाऊ सानप आयोजित श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे ‡बहुजनांचे दैवत ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत भगवानबाबा‡यांचा जन्मोत्सव व भावार्थ रामायण आयोध्या कांड ग्रंथ सांगता कार्यक्रमा प्रसंगी ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांचे सुश्राव्य असे भगवानबाबांचे चरित्रावर कीर्तन झाले . या कीर्तन सेवे साठी महाराजांनी श्री संत नीळोबाराय यांचा ४ चरणांचा संतपर प्रकरणातील अभंग ‡मार्ग दाऊनी गेले आधी दयानिधी संत ते।।१।।तेने ची पंथे चालो जाता न पडे गुंता कोठे काही।।२।। घेतला.

श्री संत भगवान बाबांचे चरित्र अलौकिक आहे, भगवान बाबांची ही १३० वी जयंती. बाबानी फक्त आध्यात्मिक च नाही तर समाज उध्दाराचे सर्वांगीण मार्ग दाखवले.उत्तम जिवण जगण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व, धमार्ची दिशा, अंधश्रद्धा निर्मूलन, निर्व्यसनी आणी मांसाहार रहित जीवन जगा, सोबतच भक्ति मागार्चे अमृत दिले. या सर्व गोष्टींचे ज्ञान जेथून प्राप्त होते ती ज्ञानेश्वरी नित्य वाचा, जातीभेद करु नका. संत भगवान बाबांनी आयुष्यभर जाति विरहित सर्व समाजाला एकत्र आणण्याचे काम केले.असे म्हटले. बाबांच्या जीवणातील अनेक प्रसंग महाराजांनी सांगीतले. या प्रतिष्ठानच्या निःस्वार्थ सेवेसाठी प्रतिष्ठानचेअध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप व परीवाराचे कौतुक ही केले. या कीर्तना नंतर महा प्रसादाच्या पंगतीचे आयोजन करण्यात आले यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेत्या प्रा. सुशीलाताई मोराळे, बीडच्या नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, काँग्रेसचे ता अध्यक्ष गणेश बजगुडे, सिटीझनचे संपादक मुजीबभाई ,भा.ज.पा नेत्या डॉ. जयश्रीताई मुंडे, अंकुशराव उगले, हनुमानप्रसाद बियाणी, उ अ आमटेसाहेब, उ अबोरखडे साहेब,अमर सपकाळ यांच्यासह विविध क्षेत्रातील असंख्य मान्यवर, टाळकरी सवार्चे स्वागत प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप व धनंजय सानप यांनी केले.या किर्तनासाठी ह भ प वैजीनाथ सानपसर, दिंगाबर कुंडलकर, किशन म माने, बंडु म जटाळ, नामदेव मुंडे, वैभव येडे,विजय वीर,सुभाष बटुळे,मुकुंद भुतपल्ले, पवन ढाकणे , आश्रुबा सानप यांनी साथ संगत केली, यावेळी मा जि प सदस्य मधुकर ढाकणे, ह भ प भास्कर जाशीं महाराज, ह भ प कचरू महाराज चव्हाण, ह भ प श्रीमंतबापु तांदळे. ह भ प दादाहारी गिते.उतमराव दोडके,मधुकर म ताटे, संतोष म राऊत,दत्तात्रय बांगर,एम. डी.पांचाळ,राजेंद्र घोलप,ग मा शहाणे,शिवलिंग घोंगडे, ए.जी नागरगोजे, आर.के भोंडवे, गणेश तांदळे,आश्रूबा नागरगोजे,पी सी मिसाळ,धनंजय सानप,जगदीश नागरे,गोरख इंदुरकर, वसंत सानप, गजानन नागरे,पाबळे इत्यादी सह प्रचंड मोठ्या संख्येने भाविक भक्त,नागरिक उपस्थित होते.

# मुलांच्या भविष्यासाठी एक किती धडपड करते याचे उत्तम उदाहरण रमाबाई ; जिल्हाधिकारी

बीड / प्रतिनिधी

रमाताईंच्या विजयामागे केवळ स्पर्धा जिंकण्याची इच्छा नव्हती तर मुलींच्या शिक्षणासाठी संघर्ष करण्याची आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी आर्थिक मदत मिळविण्याची प्रबळ प्रेरणा होती.

त्यामुळे त्यांचा हा विजय केवळ एका मॅरेथॉन स्पर्धेतील विजय न राहता आईच्या ममतेचा, त्यागाचा, संघषार्चा आणि मातृत्वाच्या जिद्दीचा विजय ठरला आहे. त्यांच्या या प्रेरणादायी यशाची दखल जिल्हा प्रशासनानेही घेतली आहे. आपल्या मुलींच्या भविष्यासाठी एक आई किती कष्ट सोसू शकते, याचे रमाताई या मूर्तिमंत उदाहरण आहेत. असे भावनिक आणि गौरवास्पद उद्गार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काढले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अपरजिल्हाधिकारी अश्विनी जिरांगे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील, उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे यांची प्रमुख उपस्थिती



होती. यावेळी महसूल अधिकारी व जिल्हा प्रशासनाच्यावतीने रमाबाई रणवीर यांचा यथोचित सन्मान करत 50 हजार रुपयांची रोख रक्कमेतून मदतीचा हात देण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पुढाकारातून मदत निधी संकलित करण्यात आला. रमाताईंच्या दोन्ही मुलींच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत भविष्यात शिक्षणासाठी काही अडचण आल्यास आपण त्यांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे असल्याची निःसंदिग्ध ग्वाही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली. जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या या संवेदनशील आणि तत्पर भूमिकेमुळे रमाबाईंच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. जिल्हा प्रशासनाने वेळेवर दिलेल्या या आर्थिक बळामुळे मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असल्याची भावनाही रमाबाई रणवीर यांनी यावेळी बोलून दाखविली. अंबाजोगाई येथे भारती शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने अमृत-2 मॅरेथॉन स्पर्धेचे दि.29 ऑगस्ट 2026 रोजी आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉन स्पर्धेत कौटुंबिक हलाखीची परिस्थिती व मुलींचे शैक्षणिक शुल्क भरावयाचे असल्याने जिद्द मनात बाळगून अनवाणी पायाने धावून मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्या ठरलेल्या रमाबाई रणवीर यांच्या पाठीवर जिल्हा प्रशासनाकडून कौतूकाची थाप देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रथमतः मनमोकळेपणाने संवाद साधत रमाबाईंचा यथोचित सन्मान करून त्यांना 50 हजार रुपयांची रोख मदत सुपूर्द करुन आपली संवेदनशीलता दाखवून दिली.

# भर न्यायालयातच न्यायाधिशांना सक्तीच्या सेवा निवृत्तीवर पाठवले ; एकच खळबळ

अंबाजोगाई / प्रतिनिधी

येथील जिल्हा व सत्र न्यायालयात न्यायालयीन कामकाज सुरू असतानाच अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांना गुरुवारी सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाच्या थेट निदेर्शानुसार बीडच्या प्रमुख जिल्हा न्यायाधीशांच्या पथकाने न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून या आदेशाची अंमलबजावणी केली.

प्रत्यक्ष कामकाज सुरू असतानाच झालेल्या या अचानक कारवाईमुळे संपूर्ण न्यायालयीन वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली आहे. न्यायालयीन कार्यपद्धतीत न्यायालयीन शुचिता राखण्याच्या उद्देशाने अपवादात्मक स्थितीत अशा प्रकारची कारवाई केली जाते. गुरुवारी सकाळच्या सत्रात डॉ. रचना तेहरा यांनी आगामी राष्ट्रीय लोकअदालतीच्या पूर्वतयारीसाठी सर्व न्यायाधीश, भूसंपादन अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक घेतली होती. ही बैठक संपवून त्या आपल्या नेहमीच्या कामकाजासाठी न्यायालयात बसल्या असता बीडहून आलेल्या प्रमुख जिल्हा न्यायाधीशांच्या पथकाने त्यांच्या



दालनात जाऊन थेट सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या आदेशांची अंमलबजावणी केली.

या नाट्यमय घडामोडीमुळे अंबाजोगाई न्यायालयातील १५ वर्षांपूर्वीच्या कटू आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत. ज्या दालनात डॉ. तेहरा यांच्यावर ही कारवाई झाली, त्याच कक्षात सुमारे दीड दशकापूर्वी तत्कालीन अतिरिक्त सत्र न्यायाधीशांवरही अशाच प्रकारे सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई करण्यात आली होती. एकाच कक्षात घडलेल्या या पुनरावृत्तीमुळे स्थानिक वकिलांमध्ये आणि प्रशासकीय वतुर्ळात दिवसभर या कारवाईची चर्चा सुरू होती.

# शेतकरी प्रश्नांवर आरपीआय सचिन खरात गटाचा एल्गार अक्षय भुंबे यांचे आव्हान

**दुष्काळ जाहीर करण्यासह पीक विमा, अनुदान व पाणीटंचाईच्या प्रश्नांवर तात्काळ निर्णय घ्या : अक्षय भुंबे**

अंबाजोगाई / प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर, महिला, निराधार, भूमिहीन तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या माध्यमातून शासनाने नागरिकांच्या मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



यावर्षी अंबाजोगाई तालुक्यासह बीड जिल्ह्यात पावसाचे अत्यल्प प्रमाण असल्याने शेतकरी, शेतमजूर, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक व सामाजिक संकटात सापडले आहेत. खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असून पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील परिस्थितीचा गांभीयार्ने विचार करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रमुख मागण्यांमध्ये बीड जिल्ह्यात सरसकट दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांचा सरसकट पीक विमा मंजूर करून त्याची रक्कम तात्काळ वितरित करावी, तसेच सन २०२४-२५ च्या खरीप पीक विम्याची थकीत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावी यांचा समावेश आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान जाहीर करून ते तातडीने वितरित करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. तसेच डिघोळ आंबा हे गाव पाटोदा सज्जामधून वगळून लोखंडी सावरगाव सज्जामध्ये समाविष्ट करावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. लाडकी बहीणह्व योजनेतून वगळण्यात आलेल्या पात्र महिलांचा योजनेत समावेश करून त्यांचे आतापर्यंतचे थकीत हप्ते तात्काळ जमा करावेत अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन तालुक्यातील गावागावांमध्ये टँकरद्वारे तसेच इतर आवश्यक माध्यमातून पिण्याच्या पाण्याची तात्काळ व्यवस्था करावी अशी मागणी करण्यात आली आहे. या विविध मागण्यांकडे शासन व प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा शेतकरी व नागरिकांचा रोष अधिक तीव्र होईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. त्यामुळे ८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या शेतकरी जनआक्रोश मोर्चाकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे. अक्षय भुंबे बादल तरकसे मीनाताई लोढे आरूण बनसोडे शेरू पठाण निवेदनावर आदीनी स्वाक्षस्या केल्या आहेत.

# मराठा आरक्षण प्रश्नी बीड जिल्हा कडकडीत बंद

बीड / प्रतिनिधी

मराठा आरक्षण प्रश्नावर मनोज जरांगे पाटील हे सराटी अंतरवाली येथे उपोषण करत आहेत. गुरुवारी त्यांच्या उपोषणाचा सहावा दिवस होता. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. यामध्ये बीड, गेवराई, माजलगाव, आष्टी, परळी, अंबाजोगाई, केज, धारूर, शिरूर या ठिकाणी कडकडीत बंद पाळण्यात आला. प्रमुख शहरांमधील बाजारपेठ सकाळपासूनच बंद होती, तर दुसरीकडे विद्यार्थीच न आल्याने शाळा-महाविद्यालयांना अघोषित सुट्टी मिळाली. बंददरम्यानच ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन देखील करण्यात आले. दरम्यान या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

वडवणीत शोले स्टाईल आंदोलन

वडवणी, पुढारी वृत्तसेवाः मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी वडवणी तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवार दि. 3 सप्टेंबर रोजी वडवणी शहरासह संपूर्ण तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. बंदला शहरातील व्यापारी, व्यावसायिकांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने नेहमी गजबजणारी बाजारपेठ दिवसभर ओस पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. बंद दरम्यान सकल मराठा समाजाच्या वतीने शहरातून भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने तरुण व समाजबांधव मोटारसायकलवर सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. घोषणांनी शहरातील वातावरण दणाणून गेले होते. रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत छत्रपती शिवाजी महाराज चौकात दाखल झाली. यानंतर आंदोलकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात बीड-परळी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. सुमारे अर्धा तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचा निषेध व्यक्त केला. यावेळी तालुक्यातील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी वडवणी पोलिसांकडून प्रमुख चौक, बाजारपेठ आणि आंदोलनाच्या ठिकाणी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वडवणीत मराठा आंदोलकांनी आणखी अनोख्या पद्धतीने आंदोलन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी काही आंदोलक चक्क पाण्याच्या टाकीवर चढले, 'शोले स्टाईल' आंदोलन करत त्यांनी सरकारविरोधात तसेच मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली. पाण्याच्या टाकीवर आंदोलक चढल्याची माहिती परिसरात पसरताच नागरिकांची मोठी गर्दी झाली. पाण्याच्या टाकीवरून आंदोलकांनी मराठा आरक्षणाचा




प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला वडवणी तालुका सकल मराठा समाजाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सरकारने आंदोलकांच्या मागण्यांकडे गांभीयार्ने पाहून तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली.

धारूरः मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांसह आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी (दि.3) पुकारण्यात आलेल्या बीड जिल्हा बंदला किल्ले धारूर शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, सकल मराठा समाजाच्या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील व्यापारी, दुकानदार, व्यावसायिक, कर्मचारी, कामगार तसेब नागरिकांनी स्वयंस्फूतीर्ने बंदमध्ये सहभाग घेतला. त्यामुळे किल्ले धारूर शहरात दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिबा दर्शविण्यासाठी बीड जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार किल्ले धारूर येथे सकल मराठा समाजाच्या वतीने व्यापारी व नागरिकांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला शहरातील व्यापारी बांधवांनी सकारात्मक प्रतिसाद देत आपापली दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवली. शहरातील प्रमुख बाजारपेठा, व्यापारी प्रतिष्ठाने तसेच विविध व्यावसायिक आस्थापना बंद राहिल्याने नेहमी गजबजलेल्या बाजारपेठेत दिवसभर शुकशुकाट दिसून आला. अत्यावश्यक सेवा वगळता बहुतांश व्यवहार बंद राहिले. शाळा, महाविद्यालये, विविध संस्था, व्यापारी आस्थापना आणि इतर व्यवसायांनीही बंदला पाठिबा दिल्याचे चित्र शहरात पाहायला मिळाले. बंदच्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाज किल्ले धारूरच्या वतीने शहरातून मोटारसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान मराठा आरक्षणाच्या मागणीच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्या. 'मराठा आरक्षण आमच्या हक्काचे', 'मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिबा' अशा घोषणांनी शहर परिसर दणाणून गेला. मोटारसायकल रॅलीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आला. यावेळी सकल मराठा समाजाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला एकजुटीने पाठिबा दर्शविला. यावेळी धारूर येथील सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेवराईः मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी सकाळी गेवराईतून मराठा बांधवांची मोटारसायकल रॅली उत्साहात रवाना झाली. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून रॅलीला सुरुवात करण्यात आली. भगवे ध्वज आणि एक मराठा, लाख मराठा'च्या घोषणांनी गेवराई शहर दुमदुमून गेले. तालुक्यातील विविध गावांमधून मोठ्या संख्येने मराठा समाजबांधव मोटारसायकलींसह रॅलीत सहभागी झाले. आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला ठाम पाठिंबा दर्शवत ही रॅली अंतरवाली सराटीच्या दिशेने रवाना झाली. रॅलीदरम्यान करण्यात आलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला दरम्यान, बीड जिल्हा बंदच्या आवाहनाला गेवराई शहरासह तालुक्यातील गावागावांत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. व्यापारी व व्यावसायिकांनी दुकाने बंद ठेवून बंदला पाठिंबा दिला. त्यामुळे गेवराई शहरातील प्रमुख बाजारपेठांसह तालुक्यातील अनेक गावांमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला.

**माजलगाव** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या सुरू असलेल्या उपोषणाला समर्थन देण्यासाठी माजलगाव शहरात गुरुवारी रास्ता रोको व माजलगाव शहर बंद आंदोलन करण्यात आले . बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आलेली असताना माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि परभणी रोड येथे समर्थकांनी रास्ता रोको केला . आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावर एकत्र येत मनोज जररांगे यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला . जरांगे यांच्या प्रकृतीची दिवसेंदिवस चिंता वाढत असताना सरकारने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकत्यांनी केली . तसेच उपोषणामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने आंदोलनाची दखल घ्यावी अशीही मागणी करण्यात आली . रास्ता रोकोमुळे शहरातील प्रमुख मार्गावरील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला .

दैनिक प्रवक्ता लोकशाहीचा

शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६

मुख्य संपादक : नितीन रावण मुजमुले, मो.9673210438



# बीड शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करा; अन्यथा आंदोलनाचा करू- यु. जि. पँथर. प्रेम कांबळे

## मोकाट जनावरांमुळे अपघातात दलित पँथर जिल्हाध्यक्ष जखमी ; जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**बीड / प्रतिनिधी**

बीड शहरातील मुख्य रस्ते व चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात मोकाट गाई, बैल, रेडे आदी जनावरे फिरत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून अपघातांचा धोका वाढला आहे. या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी दलित पँथरच्या पदाधिकाऱ्यांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.





निवेदनानुसार, मोकाट जनावरे रस्त्यावर व चौकांमध्ये दिवसभर उभी राहत असल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे शहरात अपघातांचे प्रमाण वाढून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. नुकत्याच झालेल्या एका अपघातात दलित पँथरचे जिल्हाध्यक्ष ॲड. श्री. धम्मानंद वाघमारे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नगरपरिषद व संबंधित यंत्रणेमार्फत तातडीने विशेष मोहीम राबवून रस्ते व चौकांमध्ये फिरणाऱ्या मोकाट जनावरांना पकडावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पकडलेल्या जनावरांना शहराबाहेरील गोशाळेत किंवा सुरक्षित ठिकाणी हलवावे, तसेच जनावरे रस्त्यावर सोडणाऱ्या पशुपालकांवर कठोर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करावी, अशीही मागणी आहे. अपघातात जखमी झालेल्या ॲड. धम्मानंद वाघमारे यांच्या उपचारासाठी प्रशासनाने आर्थिक मदत व भरपाई द्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. या मागण्यांवर आठ दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनकर्त्यांनी दिला आहे. निवेदनावर प्रेमभाई धम्मेंद्र कांबळे, अरविंद रा. इनकर, आकाश सावळे, यशवंत कडसकर कुकडगावकर, चंद्रे करण आप्पासाहेब, तुपार खरमोडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### अपघातात दलित पँथर जिल्हाध्यक्ष जखमी

मोकाट जनावरांमुळे झालेल्या अपघातात दलित पँथरचे जिल्हाध्यक्ष ॲड . धम्मानंद वाघमारे गंभीर जखमी झाले आहेत . त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत . या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे .

### मोकाट जनावरांचा शहरात सुळसुळाट

बीड शहरातील मुख्य रस्ते आणि चौकांमध्ये गाई, बैल, रेडे आदी मोकाट जनावरे मोठ्या प्रमाणात फिरत आहेत . रस्त्यावर जनावरे ठाण मांडून बसत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे . प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे .

### जनावरे पकडा, पशुपालकांवर कारवाई करा

नगरपरिषद व संबंधित यंत्रणांनी तातडीने मोकाट जनावरे पकडून त्यांना शहराबाहेरील गोशाळेत किंवा सुरक्षित ठिकाणी हलवावे . जनावरे रस्त्यावर सोडणाऱ्या पशुपालकांवर कठोर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे . नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे .

### आठ दिवसांत कारवाई करा ; अन्यथा आंदोलन

मोकाट जनावरांच्या समस्येवर प्रशासनाने आठ दिवसांत ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी दलित पँथरसह सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे . तसेच अपघातात जखमी झालेल्या ॲड . धम्मानंद वाघमारे यांच्या उपचारासाठी प्रशासनाने आर्थिक मदत व भरपाई द्यावी, अशीही मागणी करण्यात आली . मागण्या मान्य न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे .

# अंतरवाली सराटीवरून परतताना नितीन कदम यांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू ; पिंपळ टक्का गावावर शोककळा

## लहान मुलांवर दु :खाचा डोंगर ; लोकप्रतिनिधींनी अद्याप भेट न दिल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी



**वडवणी / प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील रहिवासी नितीन तुळशीराम कदम हे अंतरवाली सराटी येथे जाऊन परतत असताना यांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. या घटनेने पिंपळ टक्का गावावर शोककळा पसरली असून, कदम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. नितीन कदम हे आपल्या कुटुंबाचा आधार होते. त्यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे त्यांच्या लहान मुलांवर व कुटुंबीयांवर मोठे संकट ओढवले आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचे असे अचानक निधन झाल्याने नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांमधून हळहळ व्यक्त होत आहे. अंतरवाली सराटी येथून परतत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. अपघाताची बातमी गावात पोहोचताच ग्रामस्थांमध्ये शोककळा पसरली. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच अनेकांनी कदम कुटुंबीयांची भेट घेऊन दुःख व्यक्त केले.



लहान मुलांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर नितीन कदम यांच्या निधनामुळे त्यांच्या लहान मुलांच्या डोक्यावरून वडिलांचे छत्र हरपले आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या व्यक्तीच्या अचानक जाण्याने मुलांचे भवितव्य आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या दुःखद प्रसंगी प्रशासन व समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन कदम कुटुंबाला आधार देण्याची गरज ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांच्या दारात जाणारे लोकप्रतिनिधी संकटाच्या काळातही कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी व्हावेत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. नितीन कदम यांच्या आकस्मिक निधनामुळे पिंपळ टक्का गावाने एक कुटुंबवत्सल व्यक्ती गमावली आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, लहान मुलगा, व दोन मुली कुटुंबीय आणि नातेवाईक असा परिवार आहे. या दुःखद घटनेने संपूर्ण गावावर दुःखाचे सावट पसरले असून, कदम कुटुंबीयांना या कठीण प्रसंगी शासनाकडून तसेच समाजाकडून मदतीचा हात मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### लोकप्रतिनिधींनी भेट न दिल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी

दरम्यान, एवढी दु :खद घटना घडूनही संबंधित लोकप्रतिनिधींनी अद्याप कदम कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे . दु :खाच्या प्रसंगी लोकप्रतिनिधींनी कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहणे अपेक्षित असताना भेट न झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे .

# जरांगे पाटलांच्या समर्थनात पाटोदा कडकडीत बंद !

## सर्वधमीर्यांचा उत्स्फूर्त पाठिंबा ; मराठा आरक्षणाच्या मागणीला शहरातून जोरदार समर्थन

**पाटोदा / प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ आज पाटोदा शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील व्यापारी, दुकानदार, नागरिक तसेच विविध समाजघटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली दुकाने बंद ठेवली. सकाळपासूनच पाटोदा शहरातील प्रमुख बाजारपेठेसह विविध भागांमध्ये बंदचा परिणाम जाणवला. नेहमी गजबजलेल्या रस्त्यांवर तुलनेने शांतता दिसून आली. मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी सर्वधर्मीय व विविध समाजघटक एकवटल्याचे चित्र



यावेळीपाहायलामिळाले.बंददरम्यान आंदोलनकर्त्यांकडून शांततेच्या मार्गाने आपला निषेध व्यक्त करण्यात आला. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन मागणीची तातडीने दखल घ्यावी, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.पाटोद्यातील या बंदला व्यापारी वर्गासह नागरिकांनी दिलेला प्रतिसाद लक्षवेधी ठरला. एकजुटीने दिलेला हा बंदचा संदेश शासनापर्यंत पोहोचावा आणि आरक्षणाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

# सन २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्यासाठी काळ्या फीती लावून आंदोलन



**केज / प्रतिनिधी**

सन २००५ पूर्वी नियुक्त होऊनही जुनी पेन्शन योजनेपासून वंचित राहिलेल्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जुनी पेन्शन हक्क आंदोलन अंतर्गत वसंधुरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पैठण, ता. केज येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फीती लावून कामकाज केले. सन २००५ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या अनेक कर्मचाऱ्यांना अद्याप जुनी पेन्शन योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असून, शासनाने या प्रश्नाची गांभीयार्ने दखल घेऊन पात्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली.

शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी काळ्या फीती लावून आपला निषेध नोंदविला. या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाने कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून जुनी पेन्शन योजनेबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. सन २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन हा आमचा हक्क आहे. यावेळी उपस्थितीत प्राचार्य एस पी गायकवाड . मनोज शिनगारे ए एन चौधरी . लोकरे सर तोडकर मॅडम व डाके मॅडम व सर्व आदी कर्मचारी मान्यवर.

# एकलपालक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटले आनंदाचे हास्य ; ३० विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅगचे वाटप

**छ. संभाजीनगर / प्रतिनिधी**

धर्मवीर मा. खासदार स्व. मोरेश्वरजी सावे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून छत्रपती प्राथमिक विद्यालयातील एकलपालक कुटुंबातील ३० गरजू विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे शैक्षणिक साहित्याची गरज असलेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. समाजातील आर्थिकदृष्ट्या गरजू आणि एकलपालक कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे हीच समाजाप्रती खरी बांधिलकी असून, स्व. मोरेश्वरजी सावे यांच्या सामाजिक कार्याच्या विचारांना कृतीतून आदरांजली वाहण्याचा हा प्रयत्न असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या



कार्यक्रमात भारतीय जनता पार्टीचे मंडळ अध्यक्ष संजयजी बोराडे, युवा मंडळ अध्यक्ष अर्जुन कारके, वार्ड अध्यक्ष बाळकृष्ण शेवंते, संस्था अध्यक्ष सुभाष पाटील, प्रशालेच्या मुख्याध्यापिका निर्मला व्यवहारे आणि समाजभूषण रामदास वाघमारे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. स्कूल बॅग मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद हा या सामाजिक उपक्रमाचे खरे फलित ठरले. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात पुढे नेणे, हा समाजाभिमुख उपक्रमाचा सकारात्मक संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समाजाने पुढे येणे, हीच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# चौथ्या दिवशी एसएफआय, डीवायएफआयचे आंदोलन यशस्वी; प्रशासनाने दिले लेखी आश्वासन

**बीड / प्रतिनिधी**

टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) आणि डेमोक्रॅटीक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) बीड जिल्हा कमिटी तर्फे जिल्हा परिषदेच्यासमोर १ सप्टेंबरपासून सुरू झालेले बेमुदत धरणे आंदोलन अखेर आज यशस्वी ठरले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, बांधकाम विभागाचे अभियंता यांच्यासोबत आंदोलकांची सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर लेखी आश्वासन मिळाले आणि आंदोलनास तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे सलग चार दिवस झालेले आंदोलन अखेर आज यशस्वी ठरल्याचे, एसएफआय, डीवायएफआयने सांगितले.

एसएफआय, डीवायएफआयने राज्यभरात 'शाळा वाचवा, शाळा सुधारा' ही मोहीम हाती घेतली आहे. त्याच पार्श्वभूमीवर हे आंदोलन झाले. एसएफआय, डीवायएफआयने बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ३० शाळांची पाहणी केली. तेथील परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. शासन आणि प्रशासनाने त्याकडे गांभीयार्ने लक्ष देऊन त्यावर काम करणे आवश्यक आहे.





आंदोलनातील मागण्यांवर प्रशासनाने लेखी आश्वासन दिले आहे. त्यातील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत. इमारत नसलेल्या शाळांचे बांधकाम करण्यासाठी प्राधान्याने ते काम केले जाईल. आवश्यक असलेल्या ठिकाणी दुरुस्तीचे काम केले जाईल. गणवेशाचे पुढील १५ दिवसात वाटप केले जाईल. शाळांचे पत्रे खराब झाल्याने आणि खिडकीतून पाणी वर्गात येते, ते दुरुस्त करण्यात येईल. स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीज, बसण्यासाठी बाकडे, आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दररोज मेनूप्रमाणे वेगवेगळे पौष्टिक अन्न दिले जाईल. शाळांची नियमित पाहणी करण्यात येईल. शिक्षक आणि कर्मचारी यांना शाळेवर वेळेत हजर राहण्याची ताकीद देण्यात येईल, कर्तव्याशी कामचुकारपणा करणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, याबाबत सक्त आदेश देण्यात येणार आहे. शाळेच्या परिसरात फोटो/व्हिडिओ काढण्यास प्रतिबंध घालण्यात येणार नाही. विद्यार्थ्यांना प्रवास भत्ता देण्यात येतो, त्यात नियमितता ठेवली जाईल. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून त्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल. आठवी पर्यंतच्या शाळांना टप्प्याटप्प्याने डिजिटल बोर्ड उपलब्ध करून देण्यात येईल. तुकानाईक तांडा, खांडवी येथील शिक्षकाच्या अनियमितेबाबत सुनावणीनंतरची पुढील कारवाई करण्याची प्रक्रिया आठ दिवसात सुरू केली जाईल.

धोरणात्मक मुद्दे राज्य शासनाकडे पाठविले जाईल, त्यात सरकारी शाळा बंद करणे अथवा विलीनीकरण करण्याची प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी. बंद करण्यात आलेल्या अथवा विलीनीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या शाळांचा पुनर्विचार करून त्या पुन्हा सुरू करण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार करावा. पटसंख्येचे कारण दाखवून शाळा बंद करू नये, पटसंख्या वाढवण्यासाठी ठोस धोरण आखून त्यावर काटेकोरपणे काम करावे. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरावीत. एक शिक्षकी शाळेत किमान अजून एका शिक्षकाची नेमणूक करावी. आवश्यकतेनुसार नवीन शिक्षक पदांची निर्मिती करावी. सरकारी शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची (क्लार्क, शिपाई) भरती करावी. ज्या शाळांवर जाण्यासाठी रस्त्याची सोय नाही, अशा परिसरातील मजबूत रस्ते बांधणीचे काम सुरू करण्यात यावे. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत असलेल्या कामगारांच्या मानधनात वाढ करण्यात यावी. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करा. या मागण्यांचा समावेश आहे. वरील मागण्यांना घेऊन एसएफआय, डीवायएफआय च्यावतीने 'शाळा वाचवा, शाळा सुधारा' या राज्यव्यापी मोहिमे अंतर्गत दिनांक १ सप्टेंबर २०२६ पासून जिल्हा परिषद, बीड येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. आज चौथ्या दिवशी प्रशासनांसोबत आंदोलकांची सविस्तर चर्चा झाली. प्रशासनाने लेखी आश्वासनाचे पत्र दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. तसेच आश्र्वासित केल्याप्रमाणे शाळा सुधारणा बाबत कारवाई सुरू न झाल्यास व्यापक आणि तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा एसएफआय, डीवायएफआयने दिला आहे. आंदोलनाचे नेतृत्व डीवायएफआयचे राज्य अध्यक्ष मोहन जाधव, एसएफआयचे राज्य अध्यक्ष रोहिदास जाधव, डीवायएफआयचे जिल्हा अध्यक्ष सुहास झोडगे, जिल्हा सचिव विशाल देशमुख, राज्य कमिटी सदस्य प्रशांत मस्के, एसएफआयचे राज्य सहसचिव लहु खारगे, जिल्हा अध्यक्ष सत्यजित मस्के, जिल्हा सचिव पवन चिंचाणे, सुहास जायभाये, सिद्राम सोळंके, शिवा चव्हाण, मनोज देशमुख, मनोज स्वामी, आदींनी केले. प्रा. सुशीलाताई मोराळे, भाई मोहन गुंड, सुभाष डाके, संगमेश्वर आंधळकर, शेरजमाखान पठाण, नवनाथ नाईकवाडे, भागवत तावरे, संजय तांदळे, प्रा. मोहनराव परजणे, अजय राऊत, आदिल, आदींनी आंदोलनात सहभागी होऊन पाठिंबा दिला. आंदोलनात भाऊसाहेब रणदिवे, नितीन पवार, दत्ता पवार, विजय चव्हाण, चंद्रकांत गाते, विठ्ठल सक्राते, सुनील शिंदे, विजय घुगे, अरुण पांचाळ, अनिल राठोड, सचिन टिळक, विजय चव्हाण, दत्ता सुरवसे, महादेव इंगळे, संकल्प साठे, रोहित राठोड, आदी सहभागी झाले आहेत.

दैनिक, **प्रवक्ता लोकशाहीचा** हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **मुजमुले नितीन रावण** यांनी मुद्रक,जगमित्र ऑफसेट,बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै, ता,परळी वै,जि,बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून दैनिक प्रवक्ता लोकशाहीचा कार्यालय, रावण मुजमुले हाऊस नं.८०४, बिल्डींग नं.१९६ कानोबा नगर नाथापूर रोड, न्यू जीवनदीप सिनीयर कॉलेज पिंपळनेर ता.जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील) मो,९६७३२१०४३८ - ई-मेल- pravaktalokshahichagmail. com

The Daily newspaper, Pravakta Lokshahicha, is published by its publisher, owner, and editor, Mujmule Neetin Rawan. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Pravakta Lokshahicha Daily office, S/O RAWAN MUJMULE HOUSE NO. 804,BUILDING NO .196 KANOBA NAGAR NATHAPUR ROAD NEAR JEEVANDEEP SENIOR COLLEGE PIMPALNER TAL.DIST.BEED, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news published in the Daily. The responsibility for selecting the content rests with them as per the PRB Act.) Mobile: 9673210438 - Email: pravaktalokshahicha@gmail. com